एकमत

औरंगाबाद, रविवार, दिनांक १९ ऑगस्ट २००७ पृष्ठे १२+४ वर्ष १४ वे अंक ११० किंमत २ रुपये ५० पैसे

# स्वातंत्र्यदिनी बालकामगारांना कपडे, वह्या-पुस्तके वाटप

**औरंगाबाद:**-भारत देशाच्या ६० व्या स्वातंत्रा दिनानिमित्त आझाद अलीशाह शिक्षण संस्था या स्वयंसेवा संस्था एन.जी.ओ.द्वारे संचलित मिस्बा कॉलनी, मिटमिटा येथील इंड्स बालकामगार शाळेत १५ ऑगस्ट रोजी ४१ बालकामगार विद्यार्थ्यांना मोफत कपडे, वह्या, पुस्तके व शैक्षणिक साहित्य राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस पक्षाचे प्रदेश सचिव साजींद पाशा यांच्यातर्फे वाटप करण्यात आले. या वेळी राष्ट्रवादी शिक्षक संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद खैरनार प्रमुख म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमांचे बालकामगारांनी मनमोकळी चर्चा केली, प्रभात फेरी, काढली, प्रत्येक बालकामगारांनी भविष्यात काय व्हायचे इच्छा व्यक्त केली. या शिवाय सांस्कृतिक कार्यक्रमही सादर करण्यात आले. यामध्ये देशभक्तीवर अनेक गीत व नाटक या बालकामगारांनी सादर केले.

विविध कार्यक्रमातुन एकात्मतेचे सादर करण्यात आले. यामध्ये देशभक्तीवर अनेक गीत व नाटक या बालकामगांनी सादर केले. विविध कार्यक्रमातून एकात्मतेचे दर्शन घडले असे प्रमोद खैरनार यांनी भाषणात व्यक्त केले व राहिलेल्या ४७ बालकामगारांना एक महिण्याचा आत कपडे वाटप करण्याचे आश्वासनही दिले.



स्वातंत्र्यदिनानिमित्त साजीद पाशा यांच्यातर्फे ४१ बालकामगारांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. त्या प्रसंगी सुरैय्या खान, सय्यद अमजद व विद्यार्थी, पालक.